Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

जागतिकीकरणाचा इतिहास वाटचाल आणि भारतातील सदयःस्थिती

चिट्टे जी. एन.[१] , सुतार विदया अशोक[२]
[१]प्राचार्य माऊली महाविद्यालय वडाळा जि. सोलापूर
[२]मा.ह.महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय,मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर.

प्रस्तावना :- (Introduction) :-

एकविसाव्या शतकात सर्वच क्षेत्रावर जागतिकीकरणाचा प्रभव स्पष्टपणे जाणवतो. देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, संस्कृतिक तंत्रज्ञानावर पर्यावरण विषयक आघाडयांवर पडसाद उमटत असताना दिसून येत आहे व त्याचा परिणामही थेट परकीय गुंतवणुकीत वाढ, तंत्रज्ञानाचा विकास, दूरसंचार, संगणक, व्यापारी क्षेत्रात उदारीकरणश आर्थिक व बँकींग व्यवस्था नियंत्रणमुक्त होणे आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेली वाढ यावरून दिसून येत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आर्थिक व सामाकजे विकासाचा वेग वाढला असला तरी त्याचा परिणाम हा आर्थिक विकासावर झालेला आहे. विकसनशील देशातील विकास जागतिकीकरणामुळे होतो यात एकवाक्यता नाही. जागतिकीकरणाची प्रक्रिया अटळ व विकसनशील आहे ही प्रक्रिया समृध्दी व वृध्दी आणणारी आहे. जागतिकीकरणामुळे चांगल्या नोकरीच्या संधी प्राप्त होऊन अधिक चांगले जीवन जगता येईल. जगातील १४८ देशांनी विश्व व्यापार संघटनेचे सभासत्व स्विकारून जागतिकीकरणाचा अंगीकार केला. जागतिकीकरणाचाफायदा हा त्या देशाच्या विकासावर अवलंबून असतो.

जगातील उपलब्ध साधनांचा परिपूर्ण वापर करून उत्पादनात व व्यापारात वाए करण्यासाठी आणि देशादेशातील यापारी बंधने कमी करून जागतिक मुक्त व्यापार स्थिती निर्माण करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली.जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण धोरणाचा स्वीकार करीत भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल सुरू आहे. जागतिकीकरण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. भारताने १९९१ नंतरच्या कालखंडात या प्रक्रियेत सहभाग घेतला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला जगातील इतर अर्थव्यवस्थांची स्पर्धात्मक, नियमन व नियंत्रण, स्वायत्तता व खुलेपणा इ. बाबतीत जुळवून घेण्यासाठी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून एका बाजूने ही एक लोकशाही समाजवादाकडून भांडवलशाही अवस्थेकडे चाललेली वाटचाल आहे. तर दुस-या बाजूने भारतीय बाजारपेठेला जागतिक स्पर्धेत उतरविण्यासाठी उचललेले एक पाऊल आहे. जागतिक बँकेच्या मते, जगातील दारिद्रय व उपासमार घटविण्यासाठी जागतिकीकरण महत्वाचे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसित देशाकडून मुक्त व्यापाराचा आग्रह केला जात आहे. मात्र विकसनशील देशांना सुदृढ व मजबुत अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे.

जागतिकीकरण प्रक्रियेअंतर्गत भारताने वित्तीय क्षेत्रातील सुधारणा करण्याच्या हेतुने बँकींग क्षेत्राला स्पर्धात्मक बाजार पेठेत उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. बँकींग क्षेत्रातील आर्थिक व वित्तीय सुधारणा हा जागतिकीकरण प्रक्रियेचाच एक भाग आहे.

जागतिकीकरणाची वाटचाल :-

जागतिकीकरणाची वाटचाल ही ख-या अर्थाने, १९९१ मध्ये सुरू झाली. जागतिकीकरणाने जागतिक तसेच भारतावरही खूप बदल झालेले दिसून येते. तसेच जागतिक अर्थव्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे जलद गतीने होणारे जागतिकीकरण होय. माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचार प्रणातील क्रांतीमुळे जागतिकीकरण प्रक्रियेस गती प्राप्त झाली आहे. हल्ली कोणत्याही प्रकारची माहिती अत्यल्प वेळेत जगाच्या कानाकोप-यात पाठविता येते. माहिती, तंत्रज्ञान व दूरसंचार प्रणालीमुळे जग लहान होत चालले

आहे. त्यामुळे जगाची एक विस्तृत बाजारपेठ निर्माण होत आहे. भांडवली गुंतवणुक व उत्पादन केंद्र सुरू करताना सर्वाधिक नफा कोठे आहे याचा विचार प्रामुख्याने केला जातो. भांडवल आणि इतर साधनसामग्री अत्यंत गतिशील बनली आहे. माहिती तंत्रज्ञानातील क्रांती आणि संदेशवहनाच्या आधुनिक सुविधांमुळे जगातील ग्राहकांच्या आवडीनिवडी सारख्या होत आहेत. त्यामुळे सर्वत्र एकाच प्रकारच्या वस्तुंचे उत्पादन करण्याची व विकण्याची प्रवृत्ती वाढत आहे. जागतिकीकरणाचे परिणाम पाहताना वेगवेगळया फायदा – तोटयांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात योजनाबध्द आर्थिक विकास घडवून आणण्याच्या राष्ट्रीय ध्येयधोरणाच्या चौकटीत राहून, आर्थिक विकास व विकेंद्रीत सामाजिक न्याय याची गती चाढविण्याच्या कार्यात बँकींग क्षेत्र महत्वपुर्ण कामगिरी बजावत आहे. वाढत्या शहरीकरणाच्या वाढत्या गरजा व त्या पुर्ण करण्याच्या दृष्टीने बँकाचा विकास झाला. खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या (खा - उ - जा) पार्श्वभूमीवर भारताच्या अर्थव्यवस्थेतील हया महत्वपुर्ण घटकाच्या विकासाचा आढावा घेताना सर्व प्रथम भारतातील परंपरागत बँक व्यवसायाची पार्श्वभूमी पाहणे गरजेचे आहे.

I) जागतिकीकरणाची संकल्पना :-

जागतिकीकरण म्हणजे देशाची अर्थव्यवस्था जगाच्या अर्थव्यवस्थेशी जोडणे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला अर्थव्यवस्था खुली करणे, आर्थिक व्यवहारामध्ये विदेशी कंपन्याना गुंतवणुक करण्यासाठी सवलत देणे. बहुउद्देशीय कंपन्यांचा आर्थिक व्यवहारावरील बंधने आणि अडथळे दूर करणे, विदेशात संयुक्त व्यवहार करण्याला उत्तेजन देणे, आयातीवरील परिणात्मक निर्बंध दूर करून त्याऐवली आयात शुल्क आकारणे, निर्यातीला उत्तेजन देण्याचा तसेच निर्यात चाढविण्याकरिता वित्तीय दरात समायोजन करणे इ. बाबींवर भर देणे होय.

II) जागतिकीकरणाची प्रक्रिया :-

जागतिकीकरणाची प्रक्रिया राष्ट्रीय उत्पन्नाच्या रनेवर अवलंबून असते. राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा म्हणजे शेती, खाणवस्तू, खनिजापासून मिळणारे उत्पन्न अधिक असेल व त्यातही पारंपारिक तंत्राचाच वापर अधिक होत असेल तर जागतिकीकरणामुळे तोटा अधिक होईल व हे क्षेत्र तंत्रप्रगत असेल तर जागतिकीकरणाची प्रक्रिया फलदायी ठरेल. देशाची राष्ट्रीय उत्पन्नाची रचना व आर्थिक विकासाचा स्तर या अंतर्गत रचनात्मक बाबींबरोबरच त्या राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत स्थान व आंतरराष्ट्रीय व्यवपारात वाटा याचाही प्रभाव जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून मिळणा-या फायदयावर अवलंबून असतो.

जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वृध्दिंगत होण्याला मदत मिळेल. मानवी साधनसंपत्ती जी कुशल गतिमान अशी श्रमशक्ती नवे तंत्र, वस्तु व सेवेच्या विकासाला आवश्यक असते.जागतिकीकरणाची प्रक्रिया ही बाजार केंद्रीत असल्याने मागणी व पुरवठा नियम उत्पादनात लागू ठरतो. जागतिकीकरणाची ही प्रक्रिया आर्थिक परिणामाबरोबरच राजकीय क्षेत्रातही मूलभूत बदल करणारी ठरेल. राजकीयदृष्टया ही प्रक्रिया विकसनशील देशांना त्रासदायक ठरेल. या देशांनी आर्थिक व राजकीय प्रश्नांची जाण ठेवून निर्णय घेण्याची क्षमता राजकीय नेतृत्वात असेल.

III) जागतिकीकरण म्हणजे काय ? :-

जागतिकीकरण भारतीय अर्थव्यवस्थेत १९९१ पासून आर्थिक सुधारणांना वेग आला. औदयोगिक धोरणात मोठया प्रमाणावर बदल करण्यात आले. त्यातून शिथिलीकरणाच्य प्रक्रियेस सूरूवात झाली. जागतिकीकरणामुळे व्यापार वाढ, गुंतवणुक वाढ, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर शक्य होऊन विकास क्रियेला वेग येतो हे विचारात घेऊन जागतिकीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरूवात झाली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे भारतातील उदयोग व्यवसायावर मोठया प्रमाणावर परिणाम झालेला आहे.

१) “ जागतिकीकरण म्हणजे देशांतर्गत अर्थव्यवस्थेची जागतिक अर्थव्यवस्थेशी संगड घालणे होय. ”

२) “ जगाची एकच मोठी बाजारपेठ निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय. ”

३) “ जागतिकीकरण म्हणजे तौलानिक खर्च सिध्दांताची आवृत्तीच होय. ”

४) “ देशांच्या राजकीय सीमेबाहेर जाऊन व्यापार करणे म्हणजे जागतिकीकरण होय ”- दिपक नय्यर

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

५) " कोणत्याही व्यक्ती, संस्था, कंपनीला जगातील कोणत्याही प्रदेशात खरेदी, विक्री, उत्पादन, भांडवल, गुंतवणुक सेवा पुरवठा, शेती, खाणकाम, शोधक्रिया, इ. करण्याचे स्वातंत्र्य म्हणजे जागतिकीकरण होय."

६) " जागतिकीकरण म्हणजे विविध प्रकारच्या अर्थव्यवस्थांचा समूह होय. " - सी.टी. कुरियन

थोडक्यात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या तत्वांना सध्या खूपच महत्व प्राप्त झाले आहे. वरील सर्व व्याख्यांवरून असे म्ळणता येईल की, आयात निर्यात व्यापारावरील सर्व निर्बंधे दूर करणे व देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थ व्यवस्थेशी संलग्न करणे, या प्रक्रियेला जागतिकीकरण असे म्हटले जाते. जागतिकीकरणात मुक्त अर्थव्यवस्था अभिप्रेत असते.

(११ पृष्ठ क्रमांक – ७५)

IV) जागतिकीकरणाची त्रिसूत्री :-

जागतिकीकरणात जशी भौगोलिकदृष्टया विस्तारणारी बाजारपेठ अभिप्रेत आहे. तसाच बाजारपेठेत सामाविष्ट होणा-या बाबींचाही विस्तार गृहित आहे. औदयोगिक उत्पादने, शेतीमाल, गुंतवणुक सेवा, बौध्दिक संपदा अधिकार अशा सर्वांचीच बाजारपेठ जागतिक स्तरावर निर्माण होणे त्यात अपेक्षित आहे. कोणत्याही व्यक्ती, संस्था, कंपनीला जगातील कोणत्याही प्रदेशात खरेदी, विक्री उत्पादन, भांडवल, गुंतवणुक सेवा पुरवठा, शेती, खाणकाम, शोधक्रिया इ. करण्याचे स्वातंत्र्य म्हणजे जागतिकीकरण असे ढोबळमानाने म्हणता येईल आपण ज्या प्रक्रियेला आन जागतिकीकरण म्हणतो त्यामागची मुख्य याक्ती आर्थिक आहे. आर्थिक शक्तीमुळे देशादेशांतीक भिंती केसळून मानवजात जागतिक हेण्याची प्रक्रिया भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेच्या उदयापासून सूरू झाली. भांडवलशाहीचे स्वरूपच असे आहे की, तिला सतत विस्तारणा-या बाजारपेठेची गरज असते ही बाजारपेठ देशातल्या देशात विस्तारण्याला मर्यादा असतात. म्हणून भांडवलशाही व्यवस्थेबरोबर जागतिक पातळीवर विस्तारणा-या बाजारपेठ ही स्वाभाविक प्रक्रिया झाली. नवे विज्ञान व तंत्रज्ञान यांच्यामुळे आलेली औदयोगिक क्रांती भांडवलशाही यांनी आधुनिक काळातील जागतिकीकरणाचा पाया घातला. रशियातील कम्युनिस्ट राजवटीचा पाढाव ही घटना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस चालना देणारी ठरली.

त्याचबरोबर माहितीशास्त्रात प्रचंड प्रगती झाली. व्यापारात माहितीचे अनन्यसाधारण महत्व आहे. माहितीचे महत्व तिच्या तत्परतेने व अचूकतेने वाढते या प्रगतीमुळे संपुर्ण जग हे एकच क्षेत्र आहे असा विचार करणे शक्य झाले. भांडवलशाहीचा विस्तारित अंमल व दळणवळण आणि माहितीशास्त्र यातील प्रगती या देन खांबांवर जागतिकीकरणाचा पाया स्थिरावला.

त्रिसूत्री :-

ग्राहक, उत्पादक, वितरक अशा सा-यांनाच विस्तारणा-या बाजारपेठेचा लाभ मिळू शकतो हा अनुभव आल्याने त्याचा जलद आणि जास्तीत - जास्त लाभ उठविण्यासाठी काहींना त्याची गती आणि व्याप्ती वाढविण्याची आवश्यकता वाटू लागली.

१) तौलनिक लाभ
२) स्पर्धेतून विकासाकडे
३) निर्हस्तक्षेपाचे धोरण

V) देशाच्या सीमेपलीकडच्या बाजारपेठीय विस्तार :-

माणसाच्या जीवनातील सर्वच पैलूना जागतिकीकरणाचा स्पर्श झाला आहे. तंत्रज्ञान, कला, क्रिडा, खानपान, वागणे, बोलणे, शिक्षण, मनोरंजन, एवढेच काय गुन्हेगारीचेही जागतिकीकरण होत असल्याचे आपल्याला दिसते. जागतिकीकरण हे बाजारपेठेशी, अर्थव्यवस्थांच्या विकासाशी माणसाच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याशी जोडलेले आहे. त्याचा परिणाम सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक अशा सर्व क्षेत्रात अनुभवास येत असला तरी त्याचा कणा किंवा आधार हा आर्थिक आहे. बाजारपेठांचा देशांच्या सीमांपलीकडे विस्तार हा जागतिकीकरणाचा आर्थिक पैलु आहे. तेवढयाच दृष्टिकोनातून जागतिकीकरणाकडे पाहिले आहे.

" बाजार " अस्तित्वात येणे मानव समाजाच्या विकासक्रमात एक महत्वाचा टप्पा आहे. मनुष्याच्या गरजा सुनभपणे पूर्ण करण्याचे साधन म्हणजे बाजार ! बाजार अथवा बाजारपेठ म्हटल्यावर आपल्या डोळयांसमोर एक भौगोलिक क्षेत्र उभे राहते. जेथे

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

ग्राहक, विक्रेता आणि प्रत्यक्ष माल अथवा मालाचा नमुना असतो. मालाची खरेदी विक्रि ज्या जागेवर होते तो " बाजार " अशी सामान्य व्याख्या आपल्या मनात असते. याचा अनुभव प्रत्येकाला आपापल्या गावीही येत असतो. कापड बाजार, सराफ बाजार, धान्य बाजार असे भाग प्रत्येकच गावात असतात. एखादया छोटया गावातील, खेडयातील अथवा पाडयातील बाजार हा बहुधा एखादया दुस-या दुकानापुरताच मर्यादित असतो. कदाचित बाजार, बाजारपेठ हा शब्दही त्यासाठी खूप मोठा असेल पण त्या दुकानातून ग्राहक व विक्रेता यांचा व्यवहार होत असतो. भौगोलिकदृष्टया अत्यंत छोटया अशा या बाजारात व्यवहार करताना काही मर्यादा जाणवतात त्या पुढीलप्रमाणे –

१) वस्तुंची अपुरी उपलब्धता (पुरवठा)
२) वस्तुंचा सुमार दर्जा
३) ग्राहकास मर्यादित निवड स्वातंत्र्य
४) वस्तुंच्या अवाजवी किंमती
५) मर्यादित ग्राहक संख्या (मागणी)

अशा मर्यादांवर मात करण्यासाठी विस्तारित बाजारपेठ हवी. " आठवडयाचा बाजार " हे विस्तारित बाजाराचे एक प्रथम उदाहरण आहे. पंचक्रोशीतील गावांमधून ग्राहक आपल्या गरजा आणि विक्रेते माल घेऊन मोठया बाजारपेठेत एकत्र येतात आणि खरेदी – विक्री करतात. बाजारपेठ मोठी झाली तर अनेक उत्पादक व विक्रेते आपापला माल बाजारपेठेत विक्रीसाठी आणतात. त्यामुळे वस्तुंचा पुरवठा भरपूर होतो तसेच विविध प्रकारच्या वस्तु उपलब्ध झाल्याने ग्राहकास आपल्या पसंतीचा माल मिळू शकतो. उत्पादक व वितरक यांच्यात स्पर्धा राहते. परिणामतः वस्तुंचा दर्जा उंचावतो व माल वाजवी किंमतीस मिळतो. ग्राहकांना जसे हे फायदे होतात तसेच उत्पादक वितरकांनाही होतात. एकाच ठिकाणी मोठया संख्येने ग्राहक आल्याने मालाची मागणी एकत्रित होते. वितरणाचा खर्च कमी होतो. साहजिकच ग्राहक, उत्पादक व वितरक या सर्वांनाच बाजारपेठ विस्तारित व्हावी अशी इच्छा असते व त्यांचा तसा प्रयत्नही असतो.

परंतू बाजारपेठ विस्तारित करण्याच्या या प्रयत्नांत काही अडथळे / अडचणी येतात या अडचणी पुढीलप्रमाणे –

१) अंतर २) वेळ ३/ माहिती ४) भूगतान ५) जोखीम इ.

थोडक्यात, अंतर, वेळ, माहिती, जोखीम आणि भूगतान या पाच घटकांनी बाजारपेठेच्या विस्ताराला येणा-या मर्यादांवर रस्ते, वाहतुकीची साधने व प्रकार, संदेशवाहनाची प्रगत, सक्षम साधने, बँका व विमा यांची उपलब्धता व प्रगती यांनी मात केली आणि बाजारपेठ स्वाभाविकपणे लागली.

जागतिकीकरणाची भारतातील सदयःस्थिती :-

आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापार करणे म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणामुळे मोठया प्रमाणात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रगतीही होत असली तरी त्याचे परिणामही मोठया प्रमाणात भारतीय अर्थव्यवस्थेला सोसावे लागत आहेत. भारतातील वेगवेगळया गोष्टींचा भारतीय अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरण कसे झाले, त्याचे काय परिणाम झाले हे खालीलप्रमाणे आपणास पाहता येईल -

I) जागतिकीकरण आणि विकसनशील राष्ट्रे -

आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसित, विकसनशील व अविकसित अशा प्रकारच्या राष्ट्रांचा समावेश आहे. भारत हा विकसनशील देश आहे. तरीही सन १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून भारताने जागतिकीकरण मोठया प्रमाणात केल्याचे दिसत आहे. जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रे हे विकसित राष्ट्राच्या तुलनेत मागे पडतात. विकसित राष्ट्र हे विभिन्न देशातील अर्थव्यवस्थेत आपला पैसा मोठया प्रमाणात गुंतवितात वलाभ मिळवितात. ज्या देशातून लाभ मिळविला जातो त्या देशाची हानी होते. कारण त्या देशातील संपुर्णतः नैसर्गिक संपत्ती वापरून उत्पादन घेतले जाते. नैसर्गिक संपत्ती वापरून उत्पादन

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

घेतले जाते. विकसनशील देशातील लोकांना मोठया प्रमाणात रोजगारी प्राप्त होते. परंतु या देशातील अर्थव्यवस्थेपासून लाभ मिळवून स्वतःच्या देशाचीनेत्रदिपक प्रगती साध्य केली आहे. या देशाला विकासाची आवश्यकता असते देशातील संपुर्ण राज्यांचा विकास होणे अतिशय आवश्यक आहे. जागतिकीकरण झाले म्हणजे आंतरराष्ट्रीय स्पर्धा निर्माण होऊन त्या स्पर्धेतून विकसनशील देश बाहेर जातात. जागतिकीकरणामुळे जे बदल होतात त्यामुळे विकसनशील देशाची अर्थव्यवस्था प्रगती करू शकेल की नाही हा मोठा गहन प्रश्न आहे. या देशातील अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सरकारी धोरण प्रभावी असणे आवश्यक आहे.

जागतिकीकरणाचे विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम -

१) जागतिकीकरणानंतर १९९१ मण्ये राष्ट्रीय उत्पन्नात मोठया प्रमाणात बदल होत गेला व विकसनशील देशातील अर्थव्यवस्थेत ब-याच सुधारणा होत गेल्या.

२) जागतिकीकरणामुळे अप्रगत देशात देवाणघेवाण वाढून त्यांचा विकासावर परिणाम झाला.

३) जागतिकीकरणाने एकमेकांवरील अवलंबून वाढल्याने त्याचा परिणाम पायाभूत सोयी सुविधंचा एकत्रित विकास होऊ लागला आहे.

४) देशातील अतिरिक्त उत्पादन विदेशी बाजारात विकता आल्याने विदेशी गंगाजळी मिळविता येऊन देशांतर्गत विकासासाठी भांडवल वापरता येऊ लागले आहे.

II) जागतिकीकरण आणि प्रशासन :-

जागतिकीकरणामुळे विविध क्षेत्रात वस्तु, सेवा व तंत्रज्ञान नवीन प्रक्रिया आणि अभिनव योजनेचा झपाटयाने झालेला प्रसार चकित करणारा आहे. मूल्यअवस्था, राज्य कारभार, शासकीय कामकाजाचे स्वरूप बदलत चालले आहे. सर्वच क्षेत्रात एकीकडे आर्थिक लाभ वाढत असताना दुसरीकडे आर्थिक संकटाची चाहूल लागली आहे. शासन व्यवस्थेची साधने दुर्बल होऊ लागली आहे. गरीब देशातील गरीबी आधखी वाढत चालली आहे.

जागतिक संस्थांकडून विकसनशील देशांवर टाकण्यात येणारा वाढता दबाव माहिती तंत्रज्ञानाचा झालेला विकास कार्यक्षमता आणि अर्थव्यवस्थेबाबत निर्माण झालेली विशेष जागरूकता यामुळे अनेक बदल घडत आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून विकसनशील देशांना मदत केली जाते या देशाचे पाश्चिमात्य दंशांवरील आर्थिक, लष्करी, राजकीय अवलंबित्व वाढत असून त्याचे प्रतिकूल परिणाम सदयाच्या काळात दिसू लागले आहे. विकसनशील देशातील जागतिकीकरणामुळे प्रशासकीय विभागात सार्व. खर्च आणि करपध्दती यामध्ये मोठया प्रमाणावर विकास हेण्याची गरज आहे. आर्थिक स्थिती दीर्घ काळापर्यंत खालावत गेली. सामाजिक तसेच आर्थिक मंदीबरोबरच अकार्यक्षमता, निकृष्ट दर्जाची सार्व. सेवांची परिणामकारकता त्यावर हेणा-या खर्चाच्या तुलनेत फारच कमी आहे. या देशातील सार्व. प्रशासनाच्या संस्था यंत्रणा आणि प्रक्रिया अयोग्य आणि कुचकामी आहेत असे दिसून येते.

III) जागतिकीकरण व उदयोगधंदे :-

बाजारपेठ अर्थव्यवस्थेचे कामकाज सुरळीत चालवावयाचे असेल तर शासकीय पातळीवर काही निर्णय घेणे आवश्यक असते. अर्थव्यवस्था विकसित होण्यासाठी अतिरिक्त सुविधा पुरविणे गरजेचे आहे. खाजगी व्यावसायीकांना प्रोत्साहन देणे आवश्यक असते. तसेच सरकारलर नागरीकांचे हित, खाजगी संस्था, सामाजिक कृती यांचा मेळ साधावा लागतो. तेव्हा या देशांचा विकास होतो व जागतिकीकरणाच्या परिणामांची तीव्रता कमी होते.

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाचा मोठा परिणाम झाला. उदयोगधंदयांचे अस्तित्व प्रबळ झाल्याने सार्व क्षेत्राचा सहभाग संकुचित होऊ लागला. अशावेळी सरकारने शासन व्यवहारांच्य भूमिकेत खालील बाबीमध्ये बदल करणे गरजेचे आहे.

१) उदयोगांच्य विकासासाठी सशक्त कायदा व आर्थिक धोरणे ठरविणे.
२) पायाभूत सुविधा विकसित करणे.
३) न्यापुर्ण करप्रणाली निर्माण करणे

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

IV) जागतिकीकरण आणि भारतीय शेती क्षेत्र -

भारतात ब्रिटीशांचे साम्राज्य स्थापित हेाण्याच्या आधी ठिकठिकाणचे राजे जमीन महसुलाचे दर, शेतमालाच्य व्यापारावरील कर, आयात हेाणा-या शेतमालावरील व इतर आदानांवरील कर, जमिनीवरील आणि वनावरील नागरिकांचे आणि राजांचे हक्क इ. चे स्थानिक परिस्थितीनुसार नियंत्रण करीत असत. जमिनीच्या उत्पादनापासून राजाला शेतक-याचा सहावा पुत्र समजून त्याचा १/६ हिस्सा दयावा असा प्रघात हेाता. जनतेच्या अन्नधान्याच्या, चराईच्या, वन उत्पादनाबाबतच्य गरजा पुर्ण हेातील अशा प्रकारे सरकार व जनता हयांचे संबंध ठरत असत. जितके चांगले संबंध असतील तेवढा राजा व राज्य कारभार चांगला असे मानले जात असे. मेागलांनी उत्तर भारतात मातीचे, जमीन मालकीचे, सिंचनाचे, चहिवाटीचे अतिशय तपशिलवार वर्गीकरण करून महसूल पध्दती निर्माण केली. ती आता देशात अनेक राज्यांत अजुनही प्रचलित आहे. परंतू त्या काळात राजा व त्याचे सरदार यांच्यात प्रामुख्याने जमिनीची मालकी केंद्रीत असे.

ब्रिटीशांनी भारताच्या शेाषणकरता शेतीचा साधन म्हणून उपयेाग केला. देशात रस्ते, सिंचन, रेल्वे, टेलिग्राम या प्रकारच्य सुधारणांनी व्यापार, शेती - उत्पन्न इ. वाढत आहे असे दाखवून साधारणपणे दहा वर्षांनी अहवाल तयार करून ते शेतसारा वाठवित असत. शेतसारा गेाळा करण्यासाठी मालगुजार, मुजूमदार, चौधरी इ. शेत-सा-यात हिस्सा असलेली मंडळी त्यांनी तयार केली. पडित जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी इनामदार निर्माण केले. सगळया जंगलांची मालकी आदिवासी समुदायांकडून काढून घेऊन त्याचे मजुरांमध्ये रूपांतर केले आणि जंगलांची मालकी सरकारी केली.

पण भारतीय शेती क्षेत्रात जागतिकीकरणामुळे कृषीमाल संग्रहण - शीतकरण देशी योजना, विपणन व संग्रहण क्षेत्रात मेाठया प्रमाणात बदल घडून येत आहेत.

V) जागतिकीकरण आणि बँकींग क्षेत्र -

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात समाजातील गरलू अर्थात गरीब, व्यापारी व कारागीर यांना ज्या ज्या वेळी रेाख पैशांची गरज भासे त्यावेळी समाजातील भांडवलदार वर्ग म्हणजेच सावकार विविध लेाकांना कर्जपुरवठा करत असत. या पंरपरागत वा एतद्देशीय बँकींग व्यवसायातच आजच्या आधुनिक बँक व्यवसायाची पाळेमुळे आहेत.

“ भारताचा अंतर्गत व बाहय व्यापार मेाठा हेाता. सर्व व्यापा-यांना पैसे देणे, त्यांच्याकडून येणे वसूल करणे वैगरे कामे पूर्वीपासूनच या देशात चालू हेाती हे सर्व करण्यासाठी व्यापारी, सर्वसामान्य ग्राहक व इतर लेाक भारतातील सावकारांची आवश्यक तेव्हा मदत हेात. भारताच्या खेडया पाडयातून सुध्दा अगदी प्राचीन काळापासून लहानमेाठे सावकार पसरलेले हेाते. मेाठया शहरातून व राजधानीच्या शहरातून तर ते फारच मानमान्यता पावलेले हेाते. प्रांतभिन्नत्वानुसार हे सावकार वेगवेगळया नावांनी ओळखले जात. उदा. सराफ, श्रॉफ, चेट्टी, शेठ, सावकार, महाजन खत्री, खेात, गुजर इ. सर्वांचा एतद्देशीय बँका असा उल्लेख करावयास हरकत नाही. ”

आधुनिक काळातील बँका जी कामे करतात ती बहुतेक सर्व कामे हे सावकार व पेठीवाले करत असत. हया एतद्देशीय बँकासुध्दा आजच्या काळाप्रमाणेच “ ठेवी स्वीकारणे, चलनांची अदलाबदल करणे, हुंडयांचा व्यवहार करणे, स्थानिक लेाकांना कर्जे देणे - यात व्यापारी, शेतकरी, जमीनदार वैगरे लेाकांना त्यांच्या गरजांनुसार लहानमेाठया रक्कमांची व कमी - जास्त मुदतीची कर्जे देण्याचे काम या सावकारी पेठया करत.”

जागतिकीकरण आणि भारताचे नवे औदयेागिक धेारण त्याचबरेाबर बँकींग क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुधारणा घडवून आणण्यासाठी सन १९९१ पासून धेारण आखण्यात आले व त्याची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे औदयेागिक सुधारणा आणि बँकींग सुधारणा याबाबतचे बरे-वाईट परिणाम आता दृष्टीक्षेपातआले आहेत. जागतिकीकरणामुळे मेाठया प्रमाणात बँकांची सुधारणा झालेली दिसून येते. ए.टी.एम., नेट बँकींग, मेाबाईल बँकींग, केाअर बँकींग, क्रेडीट कार्ड, स्मार्ट कार्ड इ. सुविधा या महत्वाच्या आहेत.

VI) जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था :-

१) भारताने १९१-९२ पासून आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली. त्याचे अनुकूल तसेच प्रतिकूल परिणाम दिसून आले.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

२) सन १९९१ - ९२ नंतर २००० - २००१ पर्यंत भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पनवाढाचा दर ५.३ % वरून ६.१ % एवढा झाला.

३) सन १९९६ पर्यंत भारतातील चलनवाढ नियंत्रणात नव्हती त्यानंतर चलनवाढ नियंत्रणाखाली आणली आहे. सध्या चलनवाढीचा वार्षीक दर ५ % च्या दरम्यान आहे. त्यामुळे भाववाढीवर नियंत्रण आले.

४) गुंतवणुकीचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण १९८९ - ९० साली २० % होते. हल्ली ते २५ % पर्यंत आहे. म्हणजे भांडवलनिर्मितीचे प्रमाण वाढले आहे.

५) औदयोगिक उत्पादनवाढीचा वार्षीक दर १९८५ - ८६ ते १९९० - ९१ या काळात ८.५ % होता तर १९९१ - ९२ ते १९९६ - ९७ या काळात ६.२ % होता. परंतू हल्ली ९ % नी वाढला आहे.

६) आर्थिक सुधारणामुळे भारताची विदेशी व्यवहारशेषाची समस्या फलद्रूप झाली आहे. आयात व निर्यात-मूल्य यांचे स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी असणारे प्रमाण १२.४ % वरून १७.६ % पर्यंत चाढले.

७) भारताच्या विदेशी गंगाजळीत अनिवासी भारतीयांच्या ठेवीचे प्रमाण जास्त आहे. (पृष्ठ क्रमांक १३.१७)

जागतिकीकरणाचे भवितव्य व दक्षता आणि निष्कर्ष :-

विकसित देशातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची आर्थिक ताकद इतकी प्रचंड आहे की त्या राजकीय दबाव निर्माण करू शकतात. बाजारपेठेत अधिकाधिक हिस्सा मिळवून एकाधिकारशाही आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. जागतिक व्यापार संघटनेतील ट्रिप्सचा कराराचा मसुदा मोनसँटो या कंपनीने तर शेती कराराचा मसुदा कारगिल या कंपनीने तयार केला हा आता सर्वत्र खुल्या चर्चेचा विषय झाला आहे. अमेरिकन AIG या कंपनीने १२ डिसें. १९९७ रोजी सेवा क्षेत्रातील विमा बाजारपेठ मलेशियाने खुली करण्यासाठी टोकाचे दडपण आणल्याचा तपशील सर्व जगाने पाहिला आहे. अशा बहुराष्ट्रीय कंपन्या आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी सरकारांवर दबाव आणतात. फक्त विकसनशील देशातीलच नव्हे तर अमेरिका, युरोप व जपान सारख्या प्रगत देशातील सरकारांनाही त्यानुसार धोरणे आखावी लागतात असा अनुभव आहे.

विकसित देश गोंडस भाषेत जागतिकीकरणाची भलावण करून भुरळ घालतात. करारांच्य शब्दजंजाळात अडकवून हेतू लपवितात. करार एकतर्फी करतात, त्यातील दोष इतरांच्य लक्षात आल्यावर त्यांच्यात दुफळी माजवतात. त्यापुढे जाऊन आवश्यक ठरल्यास त्यात दुरूस्ती करण्याचे मान्य करतात. जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्री परिषदेत तसा जाहिरनामा संमत करतात परंतू त्याची अंमलबजावणी मात्र अजिबात करीत नाहीत. हे प्रगत राष्ट्रांचे धोरण १९८६ पासून आजपर्यंत चालू असल्याचे आपण पाहतो.

जागतिकीकरण सर्वांनाच फायदयाचे व प्रगतीचे हेण्यासाठी स्पर्धा टिकविणे आवश्यक आहे. स्पर्धा निकोप आणि समतोल पातळीवर बसली पाहिजे. अन्यथा आर्थिक दृष्टया सबळ असणारे एकाधिकारशाही आणतात. हा अनुभव आहे. देशांतर्गत व जागतिक पातळीवर स्पर्धा राखणे हे शासनाचे काम आहे. सर्वच बाबी बाजारपेठेवर सोडल्या तर स्पर्धा ुशी राहील? सभासद देशांनी WTO च्या करारानुसार आणि मंत्री परिषदेच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार देशांतर्गत धोरणे ठरविणे व राबविणे आवश्यक आहे. ही बाब सर्व देशांना सारखीच लागू असली पाहिजे. काही सशक्त देशांसाठी वेगळी सवलत असता कामा नये. स्थानिक सरकारांनी कठोरपणे जशास तसे उत्तर देण्यास शिकले पाहिजे तसे धाडस केले पाहिजे त्यांनी देशाच्या सार्वभौमत्वाबरोबरच आर्थिक परिणामांचाही विचार करून पावले उचचली पाहिजेत. हतबलतेने नव्हेत. त्यासाठी शासन सक्रिय हवेच.

जागतिकीकरण योग्य दिशेने व योग्य गतीने चालण्यासाठी WTO सारखी संस्थात्मक व्यवस्था ही गरजेची आहे. परंतू जागतिक व्यापार संघटनेच्या करारातील शब्द त्यांचे अर्थ, त्यामागील हेतू व कार्यपध्दती यावर बारकाईने लक्ष असायला हवे. मंत्रीस्तरीय बैठकीतील निर्णय महत्वाचे असल्याने व ते आता दोन वर्षातून किमान होणार असल्याने अशा बैठकीतील सहभाग अर्थपुर्ण असायला हवा. बैठक केवळ उधळून लावून काहीच साध्य होणार नाही याचे भान हवे. (०५ - पृष्ठ क्र. १०३ - १०४)

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

संदर्भग्रंथ सूची -

१) अर्थसंवाद - जाने - मार्च २०१३/खंड ३६ अंक ४ पान नं. ३५४
२) अर्थसंवाद - जुलै - सप्अें. २०१४ / खंड ३८ अंक २ पान नं. १५५
३) भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. राजेंद्र रसाळ - सक्सेस पब्लिकेशन
४) अर्थशास्त्र सेट / नेट मार्गदर्शक - प्रगती बुक्स प्रा. लि.
५) जागतिकीकरण आणि जागतिक व्यापार संघटना - डॉ. विनायक गोविलकर - ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह. नाशिक
६) अर्थसंवाद - ऑक्टो. - डिसें. २०१३ / खंड ३७ अंक - ३ पान नं. १६५
७) भारतीय अर्थव्यवस्था - सुंदरम - प्रकाशक एक चन्द्र - पृ. २४६ - २५०
८) सुधाकर शास्त्री - भारतीय अर्थव्यवस्था - प्रकाशक विश्वप्रकाश पृ. - ८९-९४
९) The Constitution of India - Directive Principles
१०) भारतीय बँक प्रणाली - डॉ. मुकुंद महाजन, भारतीय बँक प्रणाली जून २००५, निराली प्रकाशन, पुणे
११) सहकार - फडके प्रकाशन - प्रा. डॉ. रूपा शहा, डॉ. एच. दामजी
१२) भारतीय अर्थव्यवस्था - मिश्र पूरी - हिमालय पब्लिकेशन
१३) भारतीय बँक प्रणाली - डॉ. मुकुंद महाजन - जून २००५ निराली प्रकाशन, पुणे